मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 29 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# 30 ऑक्टोबरला पिंपरी-चिंचवडकरांना पाणीकपातीचा फटका!

## नागरिकांनी साठा करून ठेवावा; 31 ऑक्टोबरला सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने येणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

निगडी भक्ती शक्ती चौकात मेट्रोचे काम सुरू असून, या कामासाठी सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातून नेहरूनगरकडे जाणारी मुख्य जलवाहिनी स्थलांतरित (शिफ्ट) करावी लागणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हे काम ३० ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे.

जलवाहिनी स्थलांतरित करण्याच्या कामासाठी, सदर जलवाहिनीवरून पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या नेहरूनगर, संत तुकारामनगर, महेशनगर,



"निगडी परिसरातील मेट्रो कामाशी संबंधित जलवाहिनी स्थलांतरित करण्याचे काम तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांना होणारा तात्पुरता गैरसोय टाळण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. तरी नागरिकांनी सहकार्य करावे.

**— प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

गंगानगर, वल्लभनगर, कासारवाडी, फुगेवाडी तसेच चिखली येथील हरगुडे वस्ती, पवार वस्ती, कुदळवाडी, जाधववाडी इत्यादी भागातील ३० ऑक्टोबर रोजी संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवार (३१ ऑक्टोबर २०२५) रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.

नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा आणि पाणी काटकसरीने वापरून मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

---

# ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पाला राज्य सरकारची प्रशासकीय मान्यता

## महायुती सरकारकडून अधिकृत 'जीआर' प्रसिद्ध; मुख्यमंत्री फडणवीस यांचे विशेष लक्ष

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवडकरासंह तमाम वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धेचे स्थान असलेली इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे लवकरच प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येणार आहे.

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन-2020’ या अभियानामध्ये ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पाची घोषणा केली होती. त्यानंतर 2019 व 2024 च्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा चर्चेत राहिला. राज्य शासनाची पर्यावरण समिती आणि राज्य स्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेसाठी हा प्रकल्प प्रलंबित होता. मात्र, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पासाठी सकारात्मक पुढाकार घेतला.



दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरण समितीची मान्यता घेण्यासाठी सहकार्य केले. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मान्यता देण्यासाठी सर्वोतोपरी निर्णय घेतला. सुमारे 1 हजार 200 कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव होता. आता पहिल्या टप्प्यात 525 कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली त्याचा 'जीआर' आज प्रसिद्ध झालेला आहे.

**पर्यावरण प्रेमींच्या सूचनांचा अंतर्भाव...**

शहर आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी नदी सुधार प्रकल्पाचा विकास

"इंद्रायणी नदी केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नाही, तर आपली संस्कृती, पर्यावरण आणि शहराच्या आरोग्याशी थेट जोडलेली जीवनवाहिनी आहे. नदी सुधार प्रकल्पाला राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली. डिसेंबर- 2025 पासून या प्रकल्पाचे काम सुरू व्हावे, अशी अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे यासाठी आभार व्यक्त करतो. या प्रकल्पाद्वारे इंद्रायणी नदीला नवजीवन मिळेल, प्रदूषणमुक्त व सुरक्षित किनारे तयार होतील, तसेच नागरिकांना हरित व सुंदर नदीकाठाचा अनुभव मिळेल. आम्ही हा प्रकल्प वेळेत व गुणवत्तेने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

आराखडा अंतिम करताना महानगरपालिकेच्या MASTER PLAN मध्ये दर्शवल्यानुसार विविध ठिकाणी 60 एमएलडी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र सदर कामामध्ये प्रस्तावित केले आहे. तसेच, WATER ATM, PUBLIC TOILET, STREET FURNITURE, CHAIN LINK FENCING COMPOUND WALL आणि बायोडायव्हर्सिटी पार्क इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. त्याला राज्य सरकारच्या वतीने प्रशासकीय मान्यता मिळाली. त्याचे 'मिनिट्स' महापालिका प्रशासनाला मिळाले आहेत. केंद्र सरकारच्या अमृत- 2 उपक्रमांतर्गत या प्रकल्पाचे काम होणार आहे.

# महापालिकेच्या 93 जागांसाठी आरक्षण सोडत 10 नोव्हेंबरला!

## महिलांसह अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी गटांसाठी आरक्षण निश्‍चितीची प्रक्रिया सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेतील अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्ग (ओबीसी) तसेच, खुल्या (ओपन) गटातील या सर्व राखीव ९३ जागांवर महिलांसाठी असलेल्या जागेसाठी आरक्षण सोडत १० नोव्हेंबरला काढण्यात येणार आहे. त्याबाबतचे नियोजन करण्याचे आदेश महापालिकेच्या निवडणूक विभागाला देण्यात आले आहेत. त्यामुळे कोणत्या प्रभागात महिला आरक्षण पडणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.



महापालिकेच्या ४ सदस्यीय ३२ प्रभागांची रचना ६ ऑक्टोबरला अंतिम झाली आहे. त्यात एकूण १२८ जागा आहेत. ही प्रभाग रचना अंतिम करताना सहा प्रभागांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे लोकसंख्येसह एस.सी. व एस.टी. लोकसंख्येची आकडेवारी बदलल्याने त्या वर्गाच्या आरक्षणात बदल झाले आहेत. प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर प्रभागातील आरक्षण कसे असणार यावर इच्छुक व माजी नगर-सेवकांना निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यासाठी सर्वांचे डोळे आरक्षण सोडतीकडे लागले होते.

अखेर, राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण सोडत घेण्याचे वेळापत्रक सोमवार (दि. २७) जाहीर केले आहे. त्यामध्ये एस.सी. च्या २०. एस. टी. च्या ३ जागा अशा एकूण २३ आरक्षित जागांची संख्या निश्चित करून त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यासाठी ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरपर्यंत मुदत्त देण्यात आली आहे. सोडतीची जाहीर सूचना ८ नोव्हेंबरला वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. तर आरक्षणाची सोडत काढून सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी ११ नोव्हेंबरला पाठव्याचा म्हणजेच १० नोव्हेंबरला सोडत घ्यावी लागणार आहे.

**एस. सी. साठी या २० प्रभागांत असणार एक जागा आरक्षित**

एस. सी. प्रवर्गासाठी प्रभाग क्रमांक १९, १३, २०, २५, २३, २०, ९, ११, १६, २१. १०, ३२, २९, २७, ३१, २६, ८, ४, १७ आणि ३ या एकूण २० प्रभागात आरक्षण पडण्याची दाट शक्यता आहे. एस. सी. लोकसंख्येनुसार या प्रभागातील एका जागेवर महिला किंवा पुरूष एस. सी. प्रवगचि आरक्षण पडू शकेल. या २० पैकी १० जागा या महिलांसाठी राखीव असणार आहेत, प्रभाग क्रमांक ४, २९ आणि ३० या तीन प्रभागांत एस.टी. प्रवर्गाचे आरक्षण पडण्याची शक्यता आहे. त्यातील दोन जागा या महिलांसाठी आरक्षित असणार आहेत. या प्रवर्गात पुरुषांसाठी केवळ एक जागा राखीव असणार आहे.

**निवडणूक आयोगाच्या सूचनानुसार आरक्षण सोडत काढणार**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार विहित मुदतीत आरक्षण सोडत घेण्यात येईल. आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या काढल्या जातात. महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांकडून पारदर्शक ड्रममधून चिठ्ठी काढली जाते. त्यानुसार त्या प्रभागात महिला व पुरुष असे आरक्षण निश्चित केले जाते. यंदा आरक्षण सोडतीवर हरकती व सुचना स्वीकारण्यात येणार आहेत. आरक्षण सोडतीची तयारी करण्यात येत आहे. त्यासाठी मनुष्यबळ नेमण्यात येत आहे, असे महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

**शहराची लोकसंख्या**

(२०११ च्या जनगणनेनुसार)

एकूण लोकसंख्या-१७लाख २७ हजार ६९२

अनुसूचित जाती लोकसंख्या २ लाख ७३ हजार ८२०

अनुसूचित जमाती लोकसंख्या ३६ हजार ५३५

### 128 पैकी 93 जागा आरक्षित

» एस.सी. च्या २०, एस. टी. च्या ३ जागेनंतर ओबीसीसाठी ३५ जागांवर तसेच, खुल्या गटातील ३५ जागांवर महिलांचे आरक्षण पडणार आहे. प्रभागातील अ, ब, क आणि ड या चार जागा कोणाला सुटणार, एकूण १२८ पैकी महिलांसाठी कोणत्या प्रभागातील जागा सुटणार, याबाबत इच्छुकांसह माजी नगरसेवक व इच्छुकांचे लक्ष लागले आहे. राखीव जागेवरील खुल्या गटात पुरुषांना लडता येते; मात्र खुल्या गटातील जागेवर पुरुषांसोचत महिलांनाही लढता येते. त्यामुळे सर्व ३२ प्रभागाचे चित्र सोडतीनंतर अधिक स्पष्ट होणार आहे.

### असे आहे आरक्षण

| वर्ग | एकूण जागा | पुरूष | महिला |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती (एससी) | २० | १० | १० |
| अनुसूचित जमाती (एसटी) | ०३ | ०१ | ०२ |
| इतर मागास वर्ग (ओबीसी) | ३५ | १७ | १८ |
| सर्वसाधारण (ओपन) | ७० | ३६ | ३४ |
| एकूण | १२८ | ६४ | ६४ |

# आमदार महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन तर्फे ‘ट्रेनिंग कॅम्प 2025’ उत्साहात पार!

## आमदार महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या 11 विद्यार्थ्यांनी ब्लॅक बेल्ट मिळवत घवघवीत यश

**पिंपरी | प्रतिनीधी**

सालाबादप्रमाणे या वर्षीही आमदार महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन तर्फे आयोजित ‘ट्रेनिंग कॅम्प 2025’ उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तम प्रतिसादात यशस्वीपणे पार पडला. हा कॅम्प २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान घेण्यात आला. कॅम्पदरम्यान दरवर्षीप्रमाणेच ब्लॅक बेल्ट परीक्षा घेण्यात आली असून, यावर्षी एकूण अकरा विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन अभिमानास्पद यश संपादन केले आहे.



या यशस्वी समारोपानिमित्त आयोजित ब्लॅक बेल्ट वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष गणेश लांडगे, उपाध्यक्ष संदीप जाधव, कार्याध्यक्ष अमोल जगताप, तसेच परशुराम नवलेकर, दीपक ठाकूर, राहुल माने, विकी बोडखे, कुणाल पाटेकर यांसह संस्थेचे सर्व ब्लॅक बेल्ट सदस्य उपस्थित होते.

समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून ANT इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष अशोक थोरवे, पिंपरी-चिंचवड किक बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश बोईनवाड सर, तसेच फ्युचर वेव्ह स्कूलचे ट्रस्टी दत्तात्रय वाळके, सचिन आंबेकर सर आणि रवींद्र लबडे सर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या यशाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.


फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले की, अशा प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून समाजात शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडाभाव वाढीस लागतो. या शिबिरांतून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, आत्मविश्वास आणि शारीरिक तंदुरुस्तीचा विकास होत असल्याचेही मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

### ब्लॅक बेल्ट परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी:

» प्रज्वली पाटील, प्रेरणा हाके, वेदिका गवळी, जयवर्धन सूर्यवंशी, शंतनु पवार, श्रीअंश शिंदे, नव्या बागुल, उत्कर्ष उबाळे, सोहम साधू आणि दूर्वा लांडगे या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, सर्टिफिकेट आणि ब्लॅक बेल्ट देऊन गौरविण्यात आले. महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या आहेत.

# पुणे शहरात उंदरांचा वाढता उपद्रव

## महापालिकेने मोहीम हाती घेतली, नवे पिंजरे खरेदी; शहरातील पेठांमध्ये उंदरांची संख्या वाढली



**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील उंदरांची वाढती ‘संख्या’ आता महापालिकेच्या रडारवर आली आहे. पावसाळ्यात उंदरांच्या उपद्रवात वाढ होत असल्याने महापालिकेच्या कीटक नियंत्रण विभागाने बंदोबस्तासाठी कंबर कसली आहे. उंदीर पकडण्यासाठी एक लाख रुपयांचे पिंजरे खरेदी करण्यात आले आहेत. आरोग्य विभागाने 58 नवे पिंजरे खरेदी केले असून, 60 जुने पिंजरे वापरले जात आहेत. पिंजऱ्यांच्या साहाय्याने दरमहा 300 ते 350 जिवंत उंदीर पकडले जात आहेत.

शहरात दाट लोकवस्ती तसेच पेठांमध्ये उंदरांचा उपद्रव वाढला आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे दर महिन्याला नागरिकांकडून 20 ते 25 तक्रारी प्राप्त होतात. प्रादुर्भाव वाढलेल्या परिसरामध्ये दोन कर्मचारी पिंजरा लावतात. दोन-तीन दिवसांनी उंदीर पकडले गेल्यावर त्यांची विल्हेवाट लावली जाते.

महापालिकेतर्फे खरेदी केले जात असलेल्या एका पिंजऱ्याची किंमत सुमारे 1,800 ते 1,900 रुपये आहे. ‘रॉड टाईप वायर’ असलेले पिंजरे अधिक टिकाऊ व परिणामकारक ठरत असल्याने त्यांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. हे पिंजरे शहरातील गल्लीबोळ, बाजारपेठा, हॉटेल परिसर आणि नाले आदींजवळ उभारले जातात.

### प्रादुर्भाव रोखण्यासाठी ‘ब्लॉक’चा वापर

उंदरांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरक्षित ठिकाणी ब्लॉक ठेवले जातात. साधारणपणे 1 किलो विषारी खाद्यामध्ये 50 ब्लॉक तयार होतात. यासाठी 110 किलो विषारी खाद्य खरेदी करण्यात आले आहेत. यासाठी 1,800 रुपये प्रतिकिलो इतका खर्च होतो. ब्लॉक खाल्ल्यावर उंदरांच्या शरीरात विष शिरले की त्यांचा प्रादुर्भाव रोखता येतो. या ब्लॉकचा वापर गेल्या वर्षी प्रायोगिक तत्त्वावर कमला नेहरू रुग्णालयाच्या पार्किंगमध्ये उंदरांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आला होता.

### गोळ्यांचे वाटप

शहरातील नागरिकांकडून दरमहा 15 ते 25 तक्रारी महापालिकेकडे येतात. त्या ठिकाणी दोन ते तीन कर्मचारी तत्काळ जाऊन पिंजरे बसवतात किंवा गोळ्या ठेवतात. गाडीखान्यातून नागरिकांना मोफत उंदीर मारण्याच्या गोळ्याही दिल्या जातात. या गोळ्या बनविण्यासाठी दोन ते तीन महिला सेविका काम करतात. महापालिकेच्या गाडीखाना विभागात दरमहा 7 ते 10 हजार विषारी गोळ्या तयार होतात.

> “ महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे उदरांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंजरे, ब्लॉक, विषारी गोळ्यांचे वाटप अशा विविध उपाययोजना केल्या जात आहेत. गेल्या तीन महिन्यांत नागरिकांकडून 50 ते 75 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार उंदीर पकडण्यासाठी मोहीम आखण्यात आली आहे. ही मोहीम नागरिकांच्या सहकार्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. घरांभोवती कचरा साचू देऊ नका, अन्नकचरा उघड्यावर टाकू नका. पिंजरे किंवा गोळ्या हव्या असल्यास गाडीखान्यात संपर्क साधा.
>
> **- डॉ. राजेश दिघे, सहाय्यक आरोग्य अधिकारी**

### कुठे जास्त, कुठे कमी

» महापालिकेच्या माहितीनुसार, जुन्या पुण्यातील नदीच्या वरच्या गावठाण भागात आणि खालच्या पट्ट्यात उंदरांचा उपद्रव अधिक आहे. पेठ क्षेत्रात तुलनेने पूर्वी कमी उंदीर असत. मात्र, दाट लोकवस्तीमुळे पेठ भागामध्ये उंदरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. हॉटेल, घर, गटार, गोदाम, नाला, शाळा आणि अगदी रुग्णालयांच्या तळमजल्यातही त्यांचा वावर दिसतो.

# महापालिका निवडणुकीसाठी आरक्षण सोडत 11 नोव्हेंबरला

## 24 नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार; अंतिम सोडत 2 डिसेंबर रोजी जाहीर

**पुणे | प्रतिनीधी**

पुणे महापालिका निवडणुकीच्या तयारीला वेग आला असून, येत्या 11 नोव्हेंबरला प्रारूप आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. या सोडतीनंतर 24 नोव्हेंबरपर्यंत नागरिक, पक्ष आणि इच्छुक उमेदवारांना हरकती व सूचना नोंदविण्याची मुदत राहणार आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेप्रमाणे 2 डिसेंबर रोजी अंतिम आरक्षण सोडत जाहीर केली जाणार आहे. यानंतरच शहरातील राजकीय समीकरणे आणि संभाव्य उमेदवारींचे चित्र स्पष्ट होईल.

महापालिकेच्या आगामी निवडणुकीत 165 नगरसेवक निवडले जाणार असून, एकूण 41 प्रभाग आहेत. त्यापैकी 40 प्रभाग चार सदस्यीय तर क्रमांक 38 (आंबेगाव-कात्रज) हा प्रभाग पाच सदस्यीय आहे. एकूण जागांपैकी 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव असल्याने 83 नगरसेविका आणि 82 नगरसेवक अशी रचना होणार आहे. अनुसूचित जातींसाठी (एससी) 22, अनुसूचित जमातींसाठी (एसटी) 2 आणि ओबीसी प्रवर्गासाठी 44 जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भातील नियमावली जाहीर केली असून, त्यानुसार प्रथम एसटी, एससी आणि नंतर ओबीसीचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निश्चित केले जाणार आहे. या सोडतीतूनच कोणत्या प्रभागातून कोण उभे राहणार याचे आराखडे तयार होतील. त्यामुळे सर्व इच्छुक आणि पक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष 11 नोव्हेंबरच्या सोडतीकडे लागले आहे.



### असा आहे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

» टप्पा कालावधी/दिनांक

आरक्षित जागांची संख्या निश्चित करून प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणे - 30 ऑक्टोबर ते 4 नोव्हेंबर

आरक्षण सोडतीची जाहीर सूचना प्रसिद्ध करणे -8 नोव्हेंबर

आरक्षण सोडत काढून निकाल आयोगाकडे सादर करणे -11 नोव्हेंबर

प्रारूप आरक्षणावरील हरकती व सूचना स्वीकारण्याची अंतिम तारीख - 24 नोव्हेंबर

हरकती-सूचनांवर विचार करून निर्णय घेणे -25 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर

अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे -2 डिसेंबर

# बालभारती ते पौड फाटा मार्गाचा नव्याने आराखडा

## खर्च 32 कोटींवरून 300 कोटींवर, महापालिका पुढील अर्थसंकल्पात निधी ठेवणार



**पुणे | प्रतिनिधी**

कोथरूड व शिवाजीनगर भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बहुचर्चित बालभारती ते पौड फाटा या नियोजित मार्गाचा आराखडा तयार करून बरीच वर्षे लोटली आहेत. त्यामुळे हा रस्ता तयार करताना सध्याच्या गरजा लक्षात घेतल्या जाणार असून, त्यानुसार पुन्हा नव्याने विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच, हा आराखडा तयार करताना रस्ता, उन्नत रस्ता (उड्डाणपूल) आणि बोगदा अशा विविध पर्यायांचा विचार केला जाणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. या मार्गासाठी न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पर्यावरणीय परवानगी घेण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे देखील राम यांनी सांगितले. सुरुवातीला आराखडा तयार केला, तेव्हा प्रकल्पाचा खर्च हा 32 कोटी होता. मात्र, हा खर्च आता 300 कोटींवर पोहचला आहे.

बालभारती ते पौड फाटा हा मार्ग या मार्गाचा प्रकल्प आराखडा तयार करून बराचसा कालावधी गेला आहे. प्रकल्पाचा खर्च 32 कोटींवरून 300 कोटींवर गेला आहे. त्यामुळे या रस्त्यासाठी आर्थिक तरतूद करून सद्यःस्थितीनुसार नव्याने प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे. चालू आर्थिक वर्षात इतर प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे, त्यामुळे या प्रकल्पासाठी पुढील अंदाजपत्रकातच तरतूद करता येणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

शिवाजीनगर व कोथरूड परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बालभारती ते पौड फाटा यादरम्यान रस्ता तयार करण्यात येणार होता. मात्र, येथील वनसंपत्तीमुळे हा मार्ग तयार करण्यास पर्यावरणप्रेमींनी विरोध दर्शविला होता. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे या रस्त्याचे काम रखडले होते. दरम्यान, गेल्या दोन आठवड्यांपूर्वी सर्वोच्च न्यायालयात सर न्यायाधीश भूषण गवई आणि विनोद चंद्र यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. या रस्त्याला पर्यावरणप्रेमी नागरिकांच्या विरोधामुळे बराच विलंब झाला असून, प्रकल्पाचा खर्च देखील काही पटींनी वाढला आहे. तसेच, शिवाजीनगर व कोथरूड परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा असल्याचा युक्तिवाद महापालिकेने न्यायालयात केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने महापालिकेने हा रस्ता तयार करण्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी आणि त्यानंतर काम करावे, असे आदेश दिले होते.

यासंदर्भात माहिती देताना आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, मशहरातील कर्वे रस्ता, सेनापती बापट रस्ता, विधी महाविद्यालय रस्ता, या तीन रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी महापालिकेने बालभारती ते पौड रोड, या मार्गाचे नियोजन केले आहे. या मार्गाची चर्चा मागील 25 ते 30 वर्षांपासून सुरू आहे. हा मार्ग हनुमान टेकडी आणि एआरएआय टेकडीच्या भागातून जाणार असून, येथे जमिनीखाली भूजलक्षेत्राचे प्रमाण अधिक आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर वनसंपदा असल्याने पर्यावरण प्रेमींकडून त्यास विरोध होत आहे. या विरोधामुळे हा मार्ग तयार करण्यास विलंब झाला आहे. यामुळे प्रकल्पाचा खर्च देखील काही पटीत वाढला आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार, आम्ही पर्यावरणीय परवानगीची प्रक्रिया लवकरच सुरू करणार आहोत. या मार्गाचा प्रकल्प आराखडा तयार करून बराचसा कालावधी उलटल्याने या प्रकल्पाचा खर्च 32 कोटींवरून 300 कोटींवर पोहचला आहे. त्यामुळे तातडीने या रस्त्यासाठी निधी देणे शक्य नाही. या रस्त्यासाठी पुढील अर्थसंकल्पात तरतूद करून सध्याच्या गरजांनुसार नव्याने प्रकल्प आराखडा तयार केला जाईल. या आर्थिक वर्षात इतर प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जात आहे, असे नवल किशोर राम यांनी सांगितले.

### नवे प्रकल्प शक्य नाही

» शहरात सध्या मोठे प्रकल्प करणे शक्य नाही. त्यासाठी पालिकेकडे अपेक्षित निधी नाही. त्यामुळे बोगदे किंवा इतर मोठे प्रकल्प करण्याऐवजी शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रमुख्याने बॉटलनेक मोकळे करण्यास प्राधान्य राहील, असे आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.

# आळेफाटा उपबाजारात कांद्याच्या दरात वाढ! आवक घटल्याने शेतकरी खुश

## पावसामुळे नव्या कांद्याची काढणी रखडली; दीपावलीमुळे वाढलेली मागणीही ठरली भाववाढीचे कारण



**पुणे | प्रतिनीधी**

दीपावली सणामुळे कांद्यास वाढलेली मागणी व पावसामुळे लाल सेंद्रिय कांद्याच्या काढणीवर झालेला परिणाम यामुळे उन्हाळ कांद्याच्या भावात वाढ झाली आहे. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात रविवार (दि. 26) झालेल्या लिलावात कांद्याला प्रति दहा किलोस 221 कमाल भाव मिळाला आहे. याबाबत सभापती संजय काळे उपसभापती प्रितम काळे यांनी दिली.

एप्रिल, मे महिन्यात काढणी झालेल्या उन्हाळ कांद्याची भाव नसल्यामुळे साठवणूक करण्यात आली होती. पावसाळ्यातही कांद्याच्या दरात वाढ झाली नाही. त्यामुळे शेतकरीवर्ग आर्थिक अडचणीत सापडला होता. त्यातून पावसाने कांदा सडेल या भीतीने मिळेल त्या भावात शेतकऱ्यांना कांदा विक्री करावा लागला. बाजारपेठेत यामुळे कांद्याची आवक वाढली होती. त्यामुळे आळेफाटा उपबाजारात ऑगस्ट महिन्यात आवक वाढत गेली.

आळेफाटा उपबाजारात 14 ऑक्टोबर रोजी उन्हाळ कांद्याची उच्चांकी 25 हजार गोणी आवक झाली होती. मात्र, बाजारभाव हे प्रति दहा किलोस दीडशे रुपयांवर कमाल असेच मिळत होते. सध्या साठवणूक केलेला उन्हाळ कांदा अंतिम टप्प्यात आल्याने आवकही कमी होऊ लागली आहे.

दीपावलीनिमित्त आळेफाटा उपबाजारात मंगळवार व शुक्रवार कांदा लिलाव झाले नाही. रविवारी झालेल्या लिलावात 11 हजार 406 गोणी कांद्याची आवक झाल्याचे संचालक नबाजी घाडगे सचिव रुपेश कवडे कार्यालय प्रमुख दीपक मस्करे यांनी माहिती दिली. दक्षिणेकडील राज्यांमधून तसेच दीपावलीनिमित्त कांद्यास मागणी वाढली आहे. तर पावसाने नवीन लाल कांद्याच्या काढणीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे येथील कांद्याच्या दरात वाढ झाल्याचे आडतदार व्यापारी संजय कुन्हाडे, विजय कुन्हाडे, जीवन शिंदे, शिवप्रसाद गोळवा, अनिल गडगे, ज्ञानेश्वर गाढवे, नीलेश भुजबळ, चारुदत्त साबळे यांनी सांगितले.

### लिलावात दहा किलोस मिळालेले भाव (रुपयांत)

- एक्स्ट्रा गोळा : 200 ते 221
- सुपर गोळा : 180 ते 200
- सुपर मीडियम: 160 ते 180
- गोल्टी/ गोल्टा: 140 ते 160
- बदला/ चींगळी: 50 ते 100